

समित्या व निधी वाटपासाठी महायुतीचे धोरण निश्चित - अजित पवार

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 3 रे

www.metrocityvrutant.in बुधवार दिनांक 26/03/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन ॥ पिंपरी चिंचवड व पुणे ॥ पान 4 ॥ अंक 65 ॥ RNI - MAHMAR51259 ॥ metrocity924@gmail.com


# लोकमान्यतेसह राजमान्यतेसाठीचा ऐतिहासिक ठराव

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना केंद्र सरकारने देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार 'भारतरत्न' प्रदान करावा, या शिफारशीचा ठराव महाराष्ट्र विधानसभेने मंजूर केला. हा ऐतिहासिक ठराव महाराष्ट्र विधानसभेने एकमताने मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाधान व्यक्त केले. या ठरावाबाबत विधानसभेत निवेदन करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, "क्रांतिसूर्य महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले हे लोकमान्यतेचे प्रतीक आहेत.

भारतरत्न हा सर्वोच्च सन्मान या महान विभूतींना तो सन्मान मिळायला हवा."

या ठरावामुळे सामाजिक सुधारणांचा पाया रचणाऱ्या महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्याला सर्वोच्च मान्यता मिळणार आहे.

हा निर्णय महाराष्ट्राच्या प्रगतीशील आणि समतावादी भूमिकेला अधोरेखित करणारा आहे. 'भारतरत्न' पुरस्काराच्या माध्यमातून या विभूतींचे कार्य राष्ट्रीय स्तरावर अधोरेखित होणार असून, संपूर्ण देशासाठी हा अभिमानाचा क्षण असेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.



# विधानसभा उपाध्यक्ष पदासाठी अण्णा बनसोडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



महाराष्ट्रातील राजकीय गोंधळाच्या पार्श्वभूमीवर, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाने विधानसभेच्या उपाध्यक्ष पदासाठी पक्षाचे आमदार अण्णा बनसोडे यांच्या नावापुढे अंतिम मोहर लावली आहे. त्या नुसार महाराष्ट्र विधानसभा उप अध्यक्ष पदा साठी अण्णा बनसोडे यांनी उमेदवारी अर्ज भरला अण्णा बनसोडे हे पिंपरी विधानसभा मतदारसंघातून तीन वेळा आमदार राहिले आहेत . अण्णा बनसोडे यांनी महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष या पदाचा अर्ज भरला या प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उप मुख्यमंत्री अजित पवार ,चंद्रकांत पाटील, उदय सामंत उपस्थित होतेअर्ज विधानमंडळ सचिव जितेंद्र भोळे यांचेकडे सादर कारणात आला. अण्णा बनसोडे राजकारणात अजित पवारांचे खूप जवळचे सहकारी मानले जातात. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मुद्द्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत एक महत्त्वाची बैठक घेतली. या बैठकीत अण्णा बनसोडे यांच्या नावावर अंतिम शिक्कामोर्तब करण्यात आले.आगामी महापालिका निवडणुका लक्षात घेता, हा निर्णय राष्ट्रवादीसाठी महत्त्वाचा ठरला आहे. . कारण पिंपरी चिंचवड़ मनपा निवडणुकी साठी आता भाजप पाठोपाठ राष्ट्रवादी कांग्रेस पार्टीने सुद्धा लक्ष केंद्रीत केले आहे. तसेच अनेक इच्छूक कार्यकर्ता पदाधिकारी निवडणूकीच्या तयारीला लागले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 26/03/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# मा.नगरसेवक पंकज भालेकर यांच्या मागणीला यश

## तळवडे औद्योगिक व रहिवासी भागासाठी वीज उपकेंद्र उभारणीला वेग

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : तळवडे औद्योगिक क्षेत्रासह परिसराचा वेगाने विकास होत आहे. तुलनेत वीज पुरवठा यंत्रणेवर ताण येत वीज पुरवठा करणेकामी मर्यादा येत आहेत. त्यामुळे तळवडे एमआयडीसी क्षेत्रातील एमआयडीसीच्या ताब्यातील (कॅनबे चौक) जागा उपलब्ध झाल्याने महावितरणाचे वीज उपकेंद्र उभारणीस वेग आला आहे . यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे माजी नगरसेवक पंकज भालेकर यांनी ऑक्टोबर २०२३ रोजी मागणी केली होती त्याला यश मिळाले आहे.



तळवडे परिसरात औद्योगिक व रहिवासी भागात वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्यामुळे नागरिक व लघुउद्योजक अखंडित व पुरेशा दाबाने वीज पुरवठा होण्याची मागणी पूर्ण करणेकामी कॅनबे चौक, तळवडे एमआयडीसी येथे वीज उपकेंद्र उभारणी करणे काळाची गरज होती. त्यामुळे प्रस्तावित नवीन उपकेंद्राचा प्रकल्प अहवाल महावितरण विभागाने तयार केलेला आहे. कॅनबे चौक तळवडे येथील एमआयडीसीच्या ताब्यातील वाटप न केलेले भूखंड शिल्लक आहेत.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम क्रमांक २२ अ कलम ४० व महाराष्ट्र जमीन (शासकीय जमिनीची विल्हेवाट करणे) नियम १९७१ मधील नियम ५० मधील तसेच महसूल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक जमीन ३/२०११/प्र.क्र / ५३/अ-१ दिनांक १२/०७/२०११ च्या तरतुदीनुसार कॅनवे चौक तळवडे येथील एमआयडीसीच्या ताब्यातील भूखंडाची जागा महावितरण उपकेंद्र उभारणीसाठी उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य सरकार कडून महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळास पालकमंत्री अजितदादांनी ३२०० चौरस मीटर (३४४३२ चौरस फूट) जागा वीज उभारणीसाठी उपलब्ध करून देण्याचे ऑक्टोबर २०२३ मध्ये पुण्यातील सर्किट हाऊसमध्ये संबंधित अधिकाऱ्यांना आदेश दिले होते. त्यानुसार २४ मार्च २०२५ रोजी MIDC कडून महावितरण कंपनीला ऑफर लेटर प्राप्त झाले आहे.

तळवडे औद्योगिक व रहिवासी भागातील वीज पुरवठा सुधारण्यासाठी महावितरणाच्या वीज उपकेंद्र उभारणीला वेग मिळाल्याने तळवडे परिसरातील विद्युत समस्या नक्कीच सोडवण्यास मदत होईल. माजी नगरसेवक पंकज भालेकर यांच्या मागणीला यश मिळाल्याने आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आदेशामुळे या प्रकल्पाला पुढे चालना मिळाली आहे.

कॅनबे चौक, तळवडे एमआयडीसी येथील शासकीय भूखंडावर वीज उपकेंद्र उभारले जाईल, ज्यामुळे परिसरात वीज पुरवठा सुधारेल आणि विकासाच्या वेगात मदत होईल.

३२०० चौरस मीटर जागेची उपलब्धता ही भविष्यातील वीज मागणी पूर्ण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. तळवडेतील नागरिक आणि लघुउद्योजकांनी या निर्णयासाठी पालकमंत्री अजित पवार आणि पंकज भालेकर यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# मुंबई द्रुतगती मार्गावर खासगी प्रवासी बसला भीषण आग



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड : पुणे- मुंबई द्रुतगती मार्गावर ३० प्रवासी थोडक्यात बचावले आहेत. कोल्हापूर वरून मुंबई च्या दिशेने निघालेली खासगी प्रवासी बस चा अपघात होऊन भीषण आग लागली. ही घटना पहाटे पाच च्या सुमारास घडली आहे. सुदैवाने बस मधील ३० प्रवासी सुखरूप आहेत. या प्रकरणी शिरगाव पोलिसांनी खासगी प्रवासी बस चालक वर्षिकेत प्रल्हाद बिराजदारला ताब्यात घेतलं आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पहाटे पाच च्या सुमारास किलोमीटर ७८ येथे खासगी प्रवासी बस चा अपघात झाला.

कोल्हापूर वरून मुंबई च्या दिशेने निघालेल्या बस वरील चालक वर्षिकेत ने वाहनाला ओव्हरटेक करत असताना बस वरील ताबा सुटला आणि महामार्गावरील संरक्षण पत्र्याला तोडून बस खाली गेली.

बस मधील ३० प्रवासी जखमी झाले नाहीत.

ते खाली उतरल्यानंतर बसला भीषण आग लागली.



# कुदळवाडी ग्रामस्थ व महानगरपालिका अधिकारी याच्यामध्ये बैठकीत चे आयोजन करा दिनेश यादव याची मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी चिंचवड शहरातील कुदळवाडी भागात मागील काही दिवसापूर्वी महानगरपालिकेच्या अतिक्रम विभागाने मोठ्या प्रमाणात कारवाई केली या कारवाईबाबत अनेकांना शंका आहे याकरिता कुदळवाडी ग्रामस्थ व महानगरपालिका अधिकारी यांच्यामध्ये बैठकीचे आयोजन करावे अशी मागणी दिनेश यादव यांनी केली आहे.

महानगरपालिकेचे उप आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांना निवेदन देताना या निवेदनात दिनेश यादव यांनी नमूद केले आहे की,कुदळवाडी भागात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण कारवाई करण्यात आली .कारवाई झाल्यानंतर पुढे काय या बद्दल नागरिकांनाच्या मनात अनेक शंका आहेत. परवानगी घेण्यासाठी एक खिडकी योजना आमलात आणली गेली पाहिजे , महानगरपालिका आणि नागरिक यांच्या मध्ये मोठी दरी पडल्याचे चित्र आहे काही ठिकाणी झोनीन नसल्याने समस्या आहेत तर काही ठिकाणी बांधकाम करण्यासाठी लागणारे आवश्यक परवानगी कागदपत्रे व इतर आराखडे याबद्दल चर्चा करण्यासाठी.काही ठिकाणी रस्ते तयार करण्यात येत आहे त्या ठिकाणी महानगरपालिका वतीने देण्यात येणारा मोबदला यामध्ये काही ठिकाणी अडचणी येत आहेत या बाबत देखील नागरिक महानगरपालिका सक्षम अधिकारी याच्या सोबत चर्चा करण्याचा माणस आहे या सर्व गोष्टी चा विचार करून एक साधक बाधक चर्चा करण्यासाठी प्रशासन आणि ग्रामस्थ यामध्ये एक बैठक आयोजित करावी कशी मागणी स्वी सदस्य दिनेश यादव यांनी अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील यांच्या कडे पत्राव्दारे केली आहे त्यानीही सकारात्मक प्रतिसाद दिला आहे

# कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील झेंडेमळ्यातील रस्त्यासाठी संरक्षण मंत्र्यांना साकडे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी - देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीत येत असलेल्या संरक्षण विभागाच्या झेंडे, काळोखे, हगवणे मळा परिसरातील नागरिक रस्त्यांच्या समस्येने त्रस्त आहेत. या भागात रस्ते करण्यासाठी कॅन्टोन्मेंट बोर्डाने निविदा प्रसिध्द केली आहे. मात्र, संरक्षण विभागाची कामास हरकत आहे. त्यामुळे मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी थेट सरंक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेऊन या रस्त्याबाबत साकडे घातले आहे. यावर संपूर्ण माहिती घेऊन सदन कमांडच्या अधिकाऱ्यांना निर्देश देण्याची ग्वाही सिंह यांनी दिली. खासदार बारणे म्हणाले, संरक्षण विभागामुळे स्थानिक नागरिकांचे मोठे क्षेत्रफळ बाधित झाले आहे. संरक्षण विभागाची हद्द असल्याने नागरिकांना विविध प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील झेंडे, काळोखे, हगवणे मळा येथील एक हजार लोकसंख्या आहे. हे स्थानिक नागरिक शेतीवर अवलंबून आहेत. ७५ वर्षांपासून तिथे रहात आहेत. सद्यस्थितीत या गावात जाण्यासाठी पक्का रस्ता नाही. १९९० मध्ये देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाने कच्चा रस्ता तयार केला होता. या रस्त्याची अवस्था अतिशय बिकट झाली आहे. रस्ता खराब झाल्याने या भागातील विद्यार्थी, नागरिकांना शाळा, वैद्यकीय उपचार, शेतीचे साहित्य आणण्यासाठी देहूरोड जावे लागते. रस्ता अतिशय खराब असल्याने विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाने रस्त्या करण्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे. निविदा काढली आहे. मात्र, हा रस्ता संरक्षण विभागाअंतर्गत येतो. संरक्षण कायद्यानुसार प्रतिबंधित आहे. पूर्वी सैन्य अधिकाऱ्यांनी रस्त्याचा प्रस्ताव फेटाळला आहे. परंतु, रस्ता ही मूलभूत गरज आहे. रस्त्याची गरज आहे. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाने ३१ मार्च २०२३ रोजी प्रस्ताव मंजूर करून दक्षिणी कमांडला पाठविला होता.

प्रस्तावित रस्त्याची लांबी १८८५ मीटर आणि रुंदी ३.५ मीटर आहे. हा रस्ता संरक्षण विभागाच्या सर्वे नंबर १६३, १६४, १६१ मधून जाणार आहे. त्यामुळे हा रस्ता निर्माण करण्यासाठी मान्यता द्यावी. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड निधी आणि खासदार, आमदारांच्या निधीतून हा रस्ता पूर्ण करेल. त्यावर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले, याबाबतची संपूर्ण माहिती घेतो. त्यानुसार सदन कमांडच्या अधिकाऱ्यांना निर्देश दिले जातील.

# श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



महात्माफुले नगर चिंचवड पुणे येथे कीर्तीताई मारुती जाधव युथ फाऊंडेशन चिंचवड पुणे आयोजित श्रीमद् भागवत कथा-ज्ञानयज्ञ- सप्ताह सोहळा दि. १७ मार्च २०२५ ते २३ मार्च २०२५ या कालावधीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या सोहळ्यात कथा निरुपण धर्माचार्य डॉक्टर हभप शंकर महाराज शेवाळे यांनी केले. या निरुपणाचे एक वैशिष्ट्य असे की भागवतात 'ज्ञान- भक्ती-वैराग्य यांचा त्रिवेणी संगम आहे.

तसेच "ज्ञान" या शब्दाचा परंपरेने 'अध्यात्मिक ज्ञान' असाच अर्थ घेतला जातो.

पण याचबरोबर ऐहिक ज्ञान / भौतिक ज्ञान हाही अर्थ यात अभिप्रेत आहे.

भागवतात अध्यात्मिक ज्ञानाबरोबरच ऐहिक ज्ञान विपुल प्रमाणात आहे, विशेष म्हणजे विविध ज्ञानशाखांमधील हे ज्ञान आहे हे सर्वांसमोर येऊन त्यात अधिक संशोधन व्हायला हवे या विचाराने त्यांनी येथे निरुपण केले. 'भगवान श्रीकृष्ण भक्ती' हा तर भागवताचा आत्मा आहे तसेच ऐहिक ज्ञान हा प्राण आहे असे मत त्यांनी या निरुपणातून आवर्जून मांडले.

सदर सोहळा पार पाडण्यासाठी श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठान व परिसरातील अनेक सामाजिक संस्था, माता_भगिनी व बंधू यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

# कोविड घालवला आता क्षयरोग घालविण्याचा निर्धार करूया - डॉ. लक्ष्मण गोफणे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी (प्रतिनिधी) : सर्वांनी निर्धार केल्यास आपण कोविडप्रमाणेच १०० दिवसात क्षयरोग घालवू शकतो. असे प्रतिपादन महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी येथे केले. सध्या शहरातील ५५% लोक महापालिका रुग्णालयात सेवा घेतात. हा आकडा ८० टक्के पर्यंत नेण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.




जागतिक क्षयरोग दिनानिमित्त महापालिकेच्या वतीने ऑटो क्लस्टर सभागृहात आयोजित कार्यक्रमात डॉ. गोफणे बोलत होते. यावेळी अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली डोणे, ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर, शहर क्षयरोग नियंत्रण अधिकारी डॉ. बाळासाहेब होडगर, क्षयरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. गोविंद नरके भोसरी रुग्णालयाच्या प्रमुख डॉ. ऋतुजा लोखंडे, डॉक्टर वैशाली भामरे, सारिका लोणकर, किशोर गवळी उपस्थित होते. यावेळी बीजे मेडिकल च्या विद्यार्थ्यांनी तसेच सिंधू नगर दवाखाना येथील आशा वर्कर यांनी क्षयरोग निर्मूलनासाठी जनजागृती पर पथनाट्य सादर केले.

यावेळी डॉक्टर गोफणे म्हणाले की, पिंपरी चिंचवड महापालिकेने वैद्यकीय क्षेत्रात एक नंबरचे इन्फ्रास्ट्रक्चर उभे केले आहे. आरोग्य वैद्यकीय अधिकारी या नात्याने मी आदेश देत असलो तरी तुम्ही सारे जण अंमलबजावणी करता त्यामुळे शहरवासीयांना व रुग्णांना चांगली सेवा देता येते. ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर म्हणाले की, इतर महापालिकांच्या तुलनेत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या वतीने देण्यात येत असलेली सेवा अद्वितीय अशी आहे. कोरोना काळात महापालिका रुग्णालयांनी हजारो रुग्णांना नव संजीवनी दिली आहे. क्षयरोगाच्या उच्चाटनासाठी शासन आणि महापालिका प्रयत्न करत आहे.

मात्र अजूनही हा आजार आटोक्यात आलेला नाही. शहरात २०२२ मध्ये २९३५, २०२३ मध्ये २८८८ आणि २०२४ मध्ये ३२५६ जणांना क्षयरोगाचे निदान झाले. २०२५ फेब्रुवारी अखेर ६९४ जणांना क्षयरोग झाल्याचे आकडेवारीवरून दिसत आहे. संशयित क्षय रुग्णांच्या तपासणीवर भर देण्याची गरज आहे. लोकांनीही आजार लपवून ठेवण्यापेक्षा योग्य त्या तपासण्या करून उपचार घेतले तर क्षय रोगाचे निर्मूलन होऊ शकेल. अज्ञानात सुख असते हे गप्पा मारायला ठीक आहे. पण हे अज्ञान कोणत्याही आजाराबाबत जीवघेणे ठरू शकते त्यामुळे लोकांनी स्वतःची स्वतः काळजी घ्यावी असे आवाहन त्यांनी केले.

डॉ.अभयचंद्र दादेवार म्हणाले की सर्वांनी प्रतिज्ञा केल्यास क्षय रोगाचे उच्चाटन होईल. यावेळी राष्ट्रीय क्षयरोग धुरीकरण कार्यक्रमात सहभागी डॉक्टर, नर्सेस,आशा वर्कर यांचा सत्कार करण्यात आला. किशोर गवळी यांनी सूत्रसंचालन केले.

# समित्या व निधी वाटपासाठी महायुतीचे धोरण निश्चित - अजित पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

नांदेड : जिल्हा आणि तालुकास्तरावरील वेगवेगळ्या समित्या, विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या आणि जिल्हा नियोजन समित्यांच्या निधीचे वितरण यासंदर्भात महायुती सरकारमधील तीन पक्षांनी एक धोरण निश्चित केले असून ते १ एप्रिलनंतर लागू होईल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी येथे जाहीर केले.समित्या-निधी आणि नियुक्त्यांसंदर्भात तीन पक्षांच्या मंत्र्यांच्या एका समितीने निश्चित केलेल्या धोरणांची माहिती पवार यांनी गेल्या रविवारी येथे पार पडलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या विभागीय बैठकीमध्ये दिली. या बैठकीला



सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री नवाब मलिक, आ.संजय बनसोडे, आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्यासह प्रमुख पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी नांदेड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे आ.चिखलीकर व जिल्हाध्यक्ष दिलीप धर्माधिकारी यांनी पवार यांचे स्वागत केले.ज्या मतदारसंघामध्ये महायुतीतील ज्या पक्षाचा आमदार आहे, त्या पक्षाला तालुकास्तरीय समितीत ६० टक्के तर उर्वरित दोन पक्षांना प्रत्येकी २० टक्के प्रतिनिधित्व राहील.

जेथे महायुतीचा आमदार नाही, अशा मतदारसंघात आमच्यातील जो पक्ष दुसऱ्या क्रमांकावर राहिला, त्या पक्षाला जास्त प्राधान्य राहील, असे पवार यांनी स्पष्ट केले.

जिल्हा नियोजन समितीच्या निधीच्या वितरणात पालकमंत्र्यांना ३० टक्के तर उर्वरित ७० टक्के निधी त्या जिल्ह्यातील आमदारांमध्ये विभागला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# घरफोडी, वाहनचोरी करणाऱ्या 'बारक्या टोळी'ला अटक !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : शहर परिसरात घरफोडी, तसेच वाहनचोरीचे गुन्हे करणाऱ्या 'बारक्या' टोळीतील चौघांना गुन्हे शाखेच्या युनिट सहाच्या पथकाने अटक केली. याप्रकरणी चोरट्यांबरोबर गुन्हे करणाऱ्या एका अल्पवयीनाला ताब्यात घेण्यात आले.त्यांच्याकडून सहा गुन्हे उघडकीस आणण्यात यश आले असून १० लाख ३१ हजारांचे सोन्याचे दागिने, चार दुचाकी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पृथ्वीराज उर्फ साहील संतोष आव्हाड (वय १९, रा. हडपसर), आनंद उत्तरेश्वर




लोंढे (वय ३४, रा. हडपसर गाडीतळ), आर्यन कैलास आगलावे (वय १८, रा. कात्रज-कोंढवा रस्ता), कुलदीप गणपत सोनवणे (वय १९, रा. हडपसर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. शहरात वाहन चोरी आणि घरफोडीचे गुन्हे वाढले आहेत.

यापार्श्वभूमीवर गुन्हे शाखेच्या युनिट सहाचे पोलीस निरीक्षक वाहीद पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथक गस्त घालत होते. गुन्हेगारी वर्तुळात आव्हाड हा वयाने लहान असल्याने त्याला 'बारक्या' या टोपणनावाने ओळखले जाते. या टोळीने अलंकार, चतु:शृंगी, हडपसर, लोणीकंद भागात सहा गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त निखील पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक वाहीद पठाण, सहायक निरीक्षक मदन कांबळे, उपनिरीक्षक रामकृष्ण दळवी, पोलीस कर्मचारी बाळासाहेब सकटे, नितीन मुंढे, कानिफनाथ कारखेले, सुहास तांबेकर, सचिन पवार आणि पथकाने ही कारवाई केली.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968